सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १३१ | रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष

०१ फेब्रुवारी

- भारतीय तटरक्षक दलाचा स्थापना दिवस
- सुधी रंजन दास यांनी भारताचे ५ वे मुख्य न्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला.
- प्र. बा. गजेंद्रगडकर यांनी भारताचे ७ वे मुख्य न्यायाधीश म्हणून पदभार स्वीकारला.
- अंतराळातून परतताना स्पेस शटल कोलंबियाचा स्फोट झाला, ज्यामध्ये भारतीय वंशाच्या कल्पना चावला यांच्यासह सहा अंतराळवीरांचा मृत्यू झाला.

# अमळनेरच्या चर्मकार समाजाचा एक गाव- एक मिरवणुकीचा निर्धार

## संत शिरोमणी रविदास महाराज जयंतीनिमित्त आज शोभायात्रा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील चर्मकार समाज संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहर व ग्रामीण भागात वेगवेगळ्या वेळी व ठिकाणी शोभायात्रा काढत होते. मात्र, यापुढे एक गाव- एक मिरवणूक असा निर्धार सर्व समाजबांधवांनी केला. याबाबत श्री मंगळग्रह मंदिर येथे बुधवार, दि. १४ जानेवारी रोजी झालेल्या बैठकीत सर्व संमतीने हा निर्णय झाला होतर. या पार्श्वभूमीवर रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता मरिमाता मंदिराजवळून शोभायात्रा निघणार आहे.

समाजबांधवांनी शोभायात्रेत मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष तथा नगरसेवक डॉ. डिगंबर महाले, एकनाथ मोरे, प्रवीण वाघ, नरेश कांबळे, साहेबराव चव्हाण, गणेश जाधव, रवींद्र ठाकरे, रवींद्र साळुंखे, सुनील मोरे, सागर मोरे, कमलेश विसावे आदींनी केले आहे.

**असा साजरा होईल जयंती उत्सव**

रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता मरिमाता मंदिराजवळील संत रविदास महाराज यांच्या मंदिरात सामुहिक पूजनाचा कार्यक्रम होईल. तेथून मिरवणुकीस प्रारंभ होईल. मिरवणूक माळीवाडा, वाडी चौक, सराफ बाजार, मोठा बाजार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकमार्गे गांधलीपूरा येथे सांगता होईल. तेथेही पूजनाचा कार्यक्रम होईल. त्यानंतर मरिमाता मंदिराजवळ प्रसाद वाटप होईल. ***(संत शिरोमणी रविदास महाराज जयंती विशेष लेख पान ४ वर...)***



### संत रविदासांच्या स्मारकाचाही निर्धार

शहरात सर्वत्र विविध साधू- संत आणि समाजसुधारकांची स्मारके आहेत. मात्र, अनेकदा मागणी करूनही संत रविदास महाराज यांचे स्मारक उभारले गेले नाही. संत रविदासांचा इतिहास व त्यांची थोरवी माहीत नसल्यानेही कदाचित असे घडले असावे, अशी खंत उपस्थितांनी व्यक्त केली. आता सर्व समाजबांधव मिळून खासदार स्मितांताई वाघ, आमदार अनिलदादा पाटील व नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांना याबाबत निवेदन दिले आहे. वर्षभरात स्मारक न झाल्यास समाजबांधव वर्गणी करून संत रविदासांचे स्मारक बांधतील, असा निर्धारही समाजाने केला आहे.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

## इको वाहनाचा अपघात; तीन जण जखमी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शिंदखेडा-अमळनेर मार्गावरील कमानी गेटजवळ इको वाहन चालकाचा ताबा सुटल्याने झालेल्या अपघातात तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. या प्रकरणी येथील पोलीस ठाण्यात चालकावर शनिवार, दि. ३१ जानेवारी रोजी गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत रवींद्र रामसिंग गिरासे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे, की ते गावातील लताबाई पितांबर पाटील व हिंमत विजय पाटील आदींसह इको वाहन (एमएच १८बीआर ८४३०) मधून हनुमंतखेडा (ता. पारोळा, जि. जळगाव) येथे जात होते. सदर वाहन कल्याण गुलाब गिरासे हा चालवत होता. कल्याण गिरासेचा ताबा सुटून इको वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या विद्युत खांबाला जाऊन जोरात धडकले. यात रवींद्र गिरासे, लताबाई पाटील व हिंमत पाटील जखमी झाले.

# अनेक वर्षांपासून पाण्याच्या टाक्या अस्वच्छ!

## पाणीपुरवठा सभापतीच चक्क उतरले टाकीत अन् श्वास कोंडला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गेल्या अनेक वर्षांपासून शहरातील विविध भागातील पिण्याच्या पाण्याच्या टाक्या स्वच्छ झालेल्या नाहीत. आता गाळ काढण्याचे काम सुरू केले आहे, अशी माहिती उपनगराध्यक्ष प्रशांत निकम यांनी दिली आहे.

डॉ. परीक्षित बाविस्कर यांनी नगराध्यक्षपदाचा आणि बिल्डर प्रशांत निकम यांनी उपनगराध्यक्षपदाचा कारभार स्वीकारताच पालिकेत बारकाईने लक्ष देणे सुरू केले आहे. वारंवार पाईपलाईन का फुटतात याकडेही त्यांनी गांभिर्याने लक्ष दिले आहे. याा पार्श्वभूमीवर नगराध्यक्ष डॉ. बाविस्कर, उपनगराध्यक्ष निकम आणि पाणीपुरवठा सभापती यांनी पाणी पुरवठा यंत्रणांना भेटी दिल्या. यावेळी त्यांच्या निदर्शनास आले,



***गांधली (ता. अमळनेर) : डब्ल्यूटीपी प्लांटची पाहणी करताना उपनगराध्यक्ष प्रशांत निकम व कर्मचारी.***

की जळोद, गांधली, अंबर्शी टेकडी आदी ठिकाणी साफसफाई न झाल्याने आणि कचरा अडकल्याने पाण्याचा दाब ३६० वरून ४१० वर गेला होता. पाईप एयर लॉक झाल्याने भवरी तयार होऊन पाईप तुटण्याचे प्रमाण वाढले होते. तेथील कचरा काढल्यानंतर ३८० दाबाने पाणीपुरवठा सुरू आहे.

सभापती स्वतः उतरले टाकीत व्हॉलमन व वॉचमन असे ८ टाक्यांवर ७४ जण असूनही ही परिस्थिती कशी आली ? त्यांनतर त्यांनी पाण्याच्या टाक्यांची पाहणी स्वतः करण्याचा प्रयत्न केला. लॉग बूक आणि कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता २००३ नंतर एकही पाण्याची टाकी साफ झालेली नाही. पाणीपुरवठा सभापती कैलास पाटील यांनी स्वतः टाकीत उतरले. यावेळी त्यांचा श्वास गुदमरायला लागला होता. सुमारे तीन ते चार फूट गाळ साचला असावा. तो गाळ पक्का झाला आहे. त्यात शेवाळ, टीसीएल पावडर आणि घाण असू शकते. टाकीत उतरून गाळ काढणे अवघड आहे. टाकीत पुरेसा ऑक्सिजन मिळणार नाही. म्हणून सराईत गाळ काढणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून टाक्या साफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. टाक्यांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी केबिन कंपाऊंड, लाईट, सोलर नसल्याचे सांगितल्यानंतर पालिकेने त्यांना प्रत्येक टाकीवर लाईट व सर्व सुविधा उपलब्ध करण्याचे आश्वसन दिले.

> “नवीन निवडून आलेले नगरसेवक जनतेच्या समस्या जाणून आहेत. जनसेवेबद्दल तत्पर आहेत. नागरिकांच्या सेवेबद्दल कुचराई केली जाणार नाही.
>
> **- डॉ परीक्षित बाविस्कर , नगराध्यक्ष अमळनेर**

> “इतके दिवस नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू होता. दूषित पाण्याने अनेकांचे आरोग्य बिघडले असावे. मात्र, आता नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवल्या जातील.
>
> **- प्रशांत निकम, उपनगराध्यक्ष, अमळनेर**

> “कर्मचाऱ्यांनी नियमित टाक्या साफ करायला पाहिजे. त्यावर पालिका कर्मचारी आणि अभियंते यांनी नियंत्रण ठेवायला पाहिजे. चौकशी करून यापुढे तशी काळजी घेतली जाईल.
>
> **- गणेश शिंदे, मुख्याधिकारी, अमळनेर**

> “टाक्यांमध्ये गाळ साचला असून आता टाक्या सफाईसाठी निविदा काढण्यात येतील. नागरिकांना स्वच्छ आणि शुद्ध पाणी दिले जाईल.
>
> **- कैलास पाटील, सभापती पाणीपुरवठा समिती, अमळनेर**

# “मी सुनेत्रा अजित पवार...”

## महाराष्ट्राला लाभल्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : उपमुख्यमंत्री (स्व.) ना. अजितदादा पवार यांच्या अकाली निधनानंतर श्रीमती सुनेत्राताई पवार यांनी शनिवार, दि. ३१ जानेवारी रोजी सायंकाळी महाराष्ट्राच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आहे. राजभवन येथे झालेल्या एका छोटेखानी कार्यक्रमात राज्यपालांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. याबरोबरच सुनेत्रा पवार या महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील पहिल्या महिला उपमुख्यमंत्री बनल्या आहेत.

सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी 'अजितदादा अमर रहे' अशा घोषणा दिल्या. राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्यासह भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या नेत्यांच्या उपस्थितीत हा शपथविधी पार पडला. ना. अजितदादा पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ गटनेतेपदी श्रीमती सुनेत्राताई पवार यांची एकमताने



निवड करण्यात आली. श्रीमती सुनेत्राताई पवार यांची विधिमंडळ गटनेतेपदी निवडीचा प्रस्ताव दिलीप वळसे- पाटील यांनी मांडला, तर मंत्री ना. छगन भुजबळ यांच्याकडून या प्रस्तावाला अनुमोदन देण्यात आले.

**कोण आहेत श्रीमती सुनेत्राताई अजित पवार?**

श्रीमती सुनेत्राताई पवार यांचा जन्म १८ ऑक्टोबर १९६३ रोजी मराठवाड्यातील धाराशिव जिल्ह्यातील आहे. धाराशिवचे नेते, माजी मंत्री आणि शरद पवारांचे जुने स्नेही पद्मसिंह पाटील यांच्या त्या भगिनी आहेत. श्रीमती सुनेत्राताई पवार यांना लहानपणापासूनच राजकारण आणि समाजकारणाचा वारसा मिळाला होता. १९८०मध्ये त्यांचे ना. अजितदादा पवार यांच्याशी लग्न झाले. ना. अजितदादा पवार राजकारणात सक्रिय झाल्यानंतरही श्रीमती सुनेत्राताई पवार राजकारणापासून दूर होत्या. बारामतीमध्ये शेती आणि समाजकारणात त्यांचा सहभाग मात्र होता. २०२४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत ना. अजितदादा पवार यांनी श्रीमती सुनेत्राताई पवार यांना सुप्रिया सुळेच्या विरोधात उमेदवारी दिली. लोकसभेत पराभव झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांना राज्यसभेवर पाठविण्यात आले होते. प्रफुल पटेल यांच्या रिक्त झालेल्या जागेसाठी राज्यसभेची निवडणूक झाली होती.


# (स्व.) ना. अजितदादा पवारांच्या विमानाचा कॅप्टन ऐनवेळी बदलला

## मित्र वाहतूक कोंडीत अडकल्याने सुमीत कपूर यांनी केले सारथ्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांचा २८ जानेवारी रोजी विमान अपघातात मृत्यू झाला. त्या दिवशी पायलट सुमीत कपूर यांची ड्युटीच नव्हती. त्यांचा मित्र वाहतूक कोंडीत अडकल्यामुळे विमान कंपनीने सुमीत यांना ड्युटीवर जाण्याचे आदेश दिले, अशी माहिती समोर आली आहे. विमानाचे सारथ्य कॅप्टन सुमीत यांनी केले खरे. मात्र, त्या विमानाचा दुर्दैवी अपघात झाला आणि त्यात ना. अजितदादा पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. गुरुवार, दि. २९ जानेवारी रोजी सुमीत यांच्या पार्थिवावर शोकाकूल वातावरणात दिल्लीतील पंजाबी बाग स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

ना. अजितदादा पवार यांना मुंबईहून बारामतीला घेऊन जाणाऱ्या विमानाचा वैमानिक वाहतूक कोंडीत अडकला होता. यामुळे अपघाताच्या काही तास आधी सुमीत यांना आदेश मिळाला की, त्यांना ना. अजितदादा पवार यांना मुंबईहून बारामतीपर्यंत





एका निवडणूक रॅलीसाठी घेऊन जायचे आहे. सुमीत हे वरिष्ठ आणि अनुभवी वैमानिक होते. त्यांना सुमारे २० हजार तास उड्डाणाचा अनुभव होता. दरम्यान, बारामतीतील विमान अपघातानंतर, हातात घातलेल्या ब्रेसलेटमुळे सुमीत यांच्या मृतदेहाची ओळख पटली. त्यांच्या पश्चात पत्नी, वृद्ध वडील, मुलगा शिव आणि मुलगी सान्या असा परिवार आहे.

१९९० च्या दशकात ते सहारा एअरलाईन्समध्ये रुजू झाले. नंतर त्यांनी जेट एअरवेजमध्ये सेवा दिली. त्यांचे काम इतके बिनचूक होते, की त्यांना बोईंग ७३७ चे परीक्षक (एक्झामिनर) म्हणून नियुक्त करण्यात आले. परीक्षक होणे हे नागरी विमान वाहतुकीतील मोठे यश मानले जाते. हे खूप वरिष्ठ पद आहे. परीक्षक म्हणून सुमीत इतर वैमानिकांच्या प्रशिक्षणासाठी आणि कार्यक्षमतेसाठी जबाबदार होते. ते गेल्या पाच वर्षांपासून व्हेंचर एव्हिएशनसोबत काम करत होते. सुमीत यांच्या कुटुंबाची मुळे उत्तर प्रदेशातील मुरादाबादशी जोडलेली आहेत. तथापि, ते दिल्लीत राहत होते. लोक त्यांना प्रेमाने 'बनी' म्हणत असत. शेजाऱ्यांनी सांगितले, की त्यांनी 'बनी'ला एका चंचल मुलापासून अनुभवी कॅप्टन बनताना पाहिले होते.

**एकीकडे मरण, दुसरीकडे तोरण**

सुमीत यांचा मुलगा आणि जावई हेदेखील पायलट आहेत. हे कुटुंब लवकरच त्यांच्या नवीन घरात स्थलांतरित होण्याची तयारी करत होते. त्याआधीच सुमीत यांनी कायमसाठी जगाचा निरोप घेतला. फेब्रुवारीत सुमीत यांच्या मुलाचे लग्न होणार होते. कुटुंब लग्नाच्या तयारीमध्ये मग्न होते. विशेष म्हणजे, यंदाच्या एप्रिलमध्ये सुमीत हे ६३ व्या वर्षात पदार्पण करणार होते. येत्या दोन-तीन वर्षांत निवृत्त होऊन समाधानी जीवन जगणार, असे ते अलीकडे वारंवार बोलून दाखवत होते.

## आता नको वाटतेय!

# पाच दिवसांपूर्वीचे दादांचे शब्द

## शिलेदाराकडे मन मोकळे, दादा इतके अस्वस्थ का होते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उपमुख्यमंत्री (स्व.) ना. अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाने महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. त्यांच्या अचानक जाण्याने बारामती पोरकी झाली आहे. अजितदादांच्या अकाली एक्झिटमुळे सगळ्यांनाच धक्का बसला आहे.

**दादा अस्वस्थ होते**

(स्व.) ना. अजितदादा पवार यांना त्यांच्या तरुण काळापासून अतिशय जवळून पाहणाऱ्या किरण गुजर यांनी पाचच दिवसांपूर्वी दादांसोबत झालेला संवाद सांगितला. विद्या प्रतिष्ठानचे विश्वस्त असलेले गुजर यांना त्यावेळी (स्व.) ना. अजितदादा पवार बरेच अस्वस्थ होते. पुण्यात इतकी





विकासकामे करुनही पक्षाचा महापालिका निवडणुकीत झालेला पराभव (स्व.) ना. अजितदादा पवारांचया बराच जिव्हारी लागला होता.

**दादांच्या मनात नेमकं काय चाललेले?**

(स्व.) ना. अजितदादा पवार आठवणी सांगताना, त्यांच्या बोलताना किरण गुजर यांचा कंठ दाटून आला. 'अजितदादा ज्यांना पाहता आले नाहीत, त्यांना ते काही वेळा समजलेच नाहीत. मनापलीकडचे त्यांचे मन फार कमी जणांनी पाहिले. जेव्हा ते व्यथित व्हायचे, कधीकधी मनाला काही गोष्टी पटायच्या नाहीत. मात्र, ते तसे समोर दाखवायचे नाहीत. त्या परिस्थितीत त्यांनी आपले मन खूप कमी लोकांसमोर मोकळे केले,' असे गुजर म्हणाले.

**गुजर यांचे डोळे पाणावले, कंठ दाटला**

'दादा अशा प्रकारे जातील, याची कल्पना कोणीच केली नव्हती. विमानात बसताना त्यांनी मला फोन केला. विमानात बसत असल्याचा निरोप दिला. मी बारामतीच्या विमानतळावर गेलो. माझ्या समोर सगळे काही घडले. विमानातून दादांची बॉडी बाहेर पडली. मी म्हणतोय, हे दादा आहेत. पण तरीही विश्वास बसत नव्हता. जे घडले, त्यावर माझा अजून विश्वास बसत नाही,' हे सांगताना गुजर यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले.

(पान ३ वर)

## संपादकीय

# संस्कृत भाषा जतनाची जबाबदारी

भारताची जनगणना ही केवळ लोकसंख्येची आकडेवारी नोंदविणारी प्रक्रिया नसून, ती देशाच्या सांस्कृतिक, भाषिक आणि सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब असते. आगामी जनगणनेच्या पार्श्वभूमीवर एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. तो म्हणजे संस्कृत भाषेचे अस्तित्व आणि भवितव्य. संस्कृत ही भारताची केवळ एक भाषा नसून ती आपल्या सांस्कृतिक परंपरेची, धार्मिक आचारांची आणि तत्त्वज्ञानाची वाहक आहे. वेद, उपनिषदे, पुराणे, शास्त्रे, स्तोत्रे आणि मंत्र यांमधून हजारो वर्षे ही भाषा अखंड प्रवाहित राहिली आहे. आजही दैनंदिन प्रार्थना, धार्मिक विधी, पूजा आणि संस्कारांमध्ये संस्कृतचा वापर केला जातो. जरी ती सर्वसामान्य संभाषणाची भाषा नसली, तरी ती भारतीय जीवनपद्धतीत खोलवर रुजलेली आहे.

मात्र मागील जनगणनेतील आकडेवारीनुसार संस्कृत जाणणाऱ्या किंवा वापरणाऱ्या नागरिकांची संख्या अत्यल्प दाखविली गेली. यामुळे संस्कृतला 'लुप्तप्राय भाषा' ठरविले जाण्याची भीती व्यक्त केली जाते. एखादी भाषा लुप्तप्राय ठरली, तर तिच्या संवर्धनासाठी लागणारा शासकीय पाठिंबा, संशोधन, प्रकाशन आणि शैक्षणिक उपक्रम यांवर गंभीर परिणाम होऊ शकतो. ही बाब केवळ भाषेपुरती मर्यादित नसून, ती आपल्या सांस्कृतिक ओळखीशी निगडित आहे. संस्कृत ही अनेक भारतीय भाषांची जननी मानली जाते. तिचा प्रभाव आजही मराठीसह अनेक भाषांच्या शब्दसंपदेत, व्याकरणात आणि अभिव्यक्तीत दिसून येतो. अशा या समृद्ध भाषेचे जतन करणे ही केवळ सरकारची नाही, तर प्रत्येक जागरूक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.

जनगणनेदरम्यान भाषांविषयी विचारणा केली जाते तेव्हा नागरिकांनी आपल्या मातृभाषेसोबतच आपल्याला ज्ञात असलेल्या भाषांची माहिती नोंदविणे अपेक्षित असते. धार्मिक, सांस्कृतिक किंवा शैक्षणिक संदर्भात संस्कृतचा वापर करणाऱ्यांनी ही बाब नोंदविणे, हे भाषेच्या अस्तित्वासाठी महत्त्वाचे ठरू शकते. संस्कृत जीवंत ठेवण्यासाठी केवळ भावनिक आवाहने पुरेशी नाहीत. त्यासाठी जाणीवपूर्वक सहभाग, अभ्यास, वापर आणि पुढील पिढीपर्यंत तिचे महत्त्व पोहोचविणे आवश्यक आहे. भाषा जीवंत राहते ती बोलणाऱ्यांमुळे, वापरणाऱ्यांमुळे आणि तिच्यावर प्रेम करणाऱ्यांमुळे. संस्कृतचे जतन म्हणजे आपल्या मुळांचे जतन. ही जबाबदारी आपण सर्वांनी ओळखली, तरच ही प्राचीन, समृद्ध आणि तेजस्वी भाषा भविष्यातही तितक्याच गौरवाने नांदत राहील.

### दादा मला माफ करा..

# पहाडासारखा कट्टर विरोधकही जेव्हा अजितदादांसाठी रडला!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत पिंपरी- चिंचवडवर अधिराज्य गाजविण्यासाठी महेश लांडगे आणि (स्व.) अजितदादा पवार यांच्यात जोरदार वाकयुद्ध रंगले. या राजकीय लढाईत महेश लांडगे यांची सरशी झाली. मात्र, निवडणूक निकालानंतर पंधरा दिवसांतच (स्व.) अजितदादा पवार यांचे अपघाती निधन झाल्याने पिंपरी चिंचवड शहराचे शिल्पकार म्हणून शहरावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. (स्व.) अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहताना पहाडासारखे खमके नेते महेश लांडगे देखील अत्यंत भावुक झाले. 'दादा मला माफ करा', असे म्हणत त्यांनी केवळ ४० सेकंदात मंच सोडला.



(स्व.) अजितदादा पवार यांना पिंपरी- चिंचवड शहरवासियांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यासाठी शोकसभा आयोजित करण्यात आली होती. या शोक सभेमध्ये भारतीय जनता पक्षाचे भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांनी (स्व.) अजितदादा पवार यांच्या प्रतिमेसमोर हात जोडून आपल्या चाळीस सेकंदाच्या भाषणामध्ये त्यांना श्रद्धांजली अर्पण करत 'दादा मला माफ करा' असे म्हणत मंचावरून निघून गेले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचया निवडणुकीमध्ये अजित पवार विरुद्ध महेश लांडगे असे युद्ध पाहायला मिळाले होते. (स्व.) अजितदादा पवार केलेली टीका आणि एकेरी उल्लेख त्यांच्या जिव्हारी लागला होता. तो मोठा नेता आहे, माझा एकेरी उल्लेख करणारच, असे म्हणत (स्व.) अजितदादा पवार यांनी महेश लांडगे यांच्यावर पलटवार केला होता. पिंपरी- चिंचवड शहराच्या विकासावरून दोन्ही नेत्यांमध्ये जोरदार आरोप प्रत्यारोपांच्या फैरी रंगल्या. मात्र, (स्व.) अजितदादा पवार यांच्या शेवटच्या काही दिवसांत त्यांना आपण एकेरी बोललो, याची बोच महेश लांडगे यांना लागून राहिलेली आहे. झालेल्या चुकीची त्यांनी क्षमा मागितली. पैलवान महेश लांडगे हे खरे तर (स्व.) अजितदादा पवार यांच्याच राजकीय तालमीत तयार झाले होते. पिंपरी चिंचवड शहर उभे राहत असताना गावपुढाऱ्यांना सोबत घेऊन (स्व.) अजितदादा पवार यांनी बेरजेच्या राजकारणाची मुहूर्तमेढ रोवली. भोसरीतून महेश लांडगे यांना (स्व.) अजितदादा पवार यांनी मोठी ताकद दिली. आधी नगरसेवक आणि नंतर स्थायी समितीचे अध्यक्षपदही दिले. महेश लांडगे तीन वेळा राष्ट्रवादीतून नगरसेवक झाले. याचाच अर्थ (स्व.) अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनात महेश लांडगे यांच्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात झाली. पुढे विधानसभेच्या उमेदवारीवरून अजित पवार यांच्याशी त्यांचे मतभेद झाले आणि २०१४मध्ये त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली. त्यानंतर तीन वर्षांनी त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. पुढे त्यांनी (स्व.) अजितदादा पवार यांच्याशी उघडपणे संघर्ष पुकारला.

पान १ वरून...

## पाच दिवसांपूर्वीचे दादांचे शब्द

**दादांची व्यथा काय होती?**

'पाच दिवसांपूर्वी अजितदादा म्हणाले, मला कंटाळा आलाय. आपण बाहेर जाऊया. आम्ही दोघे बाहेर गेलो. अर्धा दिवस बाहेर फिरलो. एका ठिकाणी बसलो, तिथे जेवलो. त्यावेळी दादा म्हणाले, मला नको वाटतंय आता. बास वाटतंय. या सगळ्या गोष्टींचा त्रास होतोय मला. त्यांना अलीकडे असे का वाटू लागले होते, माहीत नाही, अशा शब्दांत गुजर यांनी दादांसोबत झालेला पाच दिवसांपूर्वी झालेला संवाद सांगितला.

**अस्वस्थ दादा, मनात घालमेल**


'अजित दादांना जवळून पाहताना त्या हळव्या मनाची उकल झाली तेव्हा वाटायचे, मी इतके काम करतोय, मर मर मरतोय, रात्रंदिवस काम करतोय. तरीही माझ्या वाट्याला गालबोट का लागतेय? याची त्यांना फार खंत होती,' अशा शब्दांत गुजर यांनी दादांच्या मनात सुरु असलेली घालमेल सांगितली. दादा विधानसभा लढवायला तयार नव्हते 'थांबावंसं वाटतंय, असं ते प्रत्येकवेळी म्हणायचे. तेव्हा मी त्यांना म्हणायचो, दादा थांबून चालणार नाही. विधानसभेच्या वेळी त्यांची निवडणूक लढण्याची इच्छा नव्हती. त्यांना समजवायला मी मुंबईला गेलो होतो. म्हटलं, दादा बारामती पोरकी होईल. दादा, असं कसं चालेल? त्यावर दादा म्हणाले, मी इतकं करुन जर लोकसभेला वहिनींच्या बाबतीत असं झालं तर, विधानसभेचं काय? त्यावर मी म्हणालो, दादा तसं होणार नाही. दोन गोष्टी वेगळ्या आहेत दादा. तुम्ही समजून घ्या,' अशी आठवण गुजर यांनी कथन केली. मी कोणाचं वाईट केलंय, दादांचा उद्विग्न सवाल 'मला अजितदादा म्हणाले, बारामतीच्या बाबतीत माझ्यावर टीका होते. लोक असे का वागतात? मी कोणाचे वाईट केलंय? असे प्रश्न दादांनी विचारले. हा विचार करुन दादा अलीकडे फार व्यथित होऊ लागले होते. १९८६, १९९१ मध्ये अजितदादांचे व्यक्तिमत्व अतिशय करडे होते. मात्र, आता अलीकडच्या काळात ते बदलायला लागले होते,' असेही गुजर यांनी सांगितले.

# शरद पवारांच्या खासदारकीचा २ एप्रिल शेवटचा दिवस

## त्यापूर्वी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासंदर्भात काय ठरले होते ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

खासदार शरद पवार यांच्या राज्यसभेच्या खासदारकीचा कार्यकाळ २ एप्रिल रोजी संपुष्टात येत आहे. त्याच दिवशी शरद पवार सक्रिय राजकारणातून निवृत्त होणार होते. मात्र, तत्पूर्वी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासंदर्भात काय ठरले होते ? जाणून घेऊयात.





गेल्या काही महिन्यांपासून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार याची चर्चा रंगली होती. इतकेच नव्हे तर (स्व.) उपमुख्यमंत्री ना. अजितददादा पवार आणि शरद पवार यांच्यामध्ये वाढलेली जवळीक आणि त्यांच्या भेटीगाठी सुद्धा बरेच काही सांगून जात होत्या. मात्र, (स्व.) ना. अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने दोन्ही राष्ट्रवादीमध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे. राष्ट्रवादीची दोन शकले झाली असली तरी (स्व.) ना. अजितदादा पवारांना मानणारे दोन्हीकडेही नेते आहेत. कुटुंबामधील राजकीय दरी सुद्धा कमी झाली होती. जे आमदार रोहित पवार, खासदार सुप्रिया सुळे व (स्व.) अजितदादा पवारांच्या विरोधात आक्रमकपणे बोलत होते, त्यांनी गेल्या काही महिन्यांपासून तलवार म्यान केली आहे. मलिदा गँग असाच उल्लेख रोहित पवार यांच्याकडून केला जात होता. मात्र, आता मलिदा गँग वगैरे असा उल्लेख न करता शरद पवार (स्व.) अजितदादा पवारांच्या मदतीला धावून येत असल्याचे चित्र निर्माण झाले होते.

**दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची चर्चा**

त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यावर चर्चा रंगली होती. महापालिकेत निवडणुकीमध्येही दोन्ही राष्ट्रवादीने एकत्रित येऊन निवडणूक सुद्धा लढली होती. यामध्ये एकमेकांचे उमेदवार सुद्धा एकमेकांच्या चिन्हांवर निवडणूक लढताना दिसून आले. त्यामुळे आता या दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासाठी केवळ औपचारिकता बाकी आहे अशीच चर्चा रंगली होती. मात्र, आता (स्व.) अजितदादा पवार यांच्या धक्कादायक निधनाने या सर्वांवर पाणी फेरले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून केवळ (स्व.) अजितदादा पवार हेच चर्चेमध्ये सामील होते, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून स्वतः शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, जेष्ठ नेते जयंत पाटील यांच्यासह खासदार डॉ. अमोल कोल्हे शशिकांत शिंदे हे सुद्धा चर्चेमध्ये सहभागी होते.

सुप्रिया सुळे पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा होणार होत्या. दुसरीकडे, दरम्यान दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यानंतर कोणता मसुदा निश्चित करण्यात आला होता या संदर्भात सुद्धा माहिती समोर आली आहे. राष्ट्रवादीमधील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार २ एप्रिल रोजी शरद पवार यांच्या राज्यसभेच्या खासदारकीचा कार्यकाळ संपुष्टात येत आहे. त्याच दिवशी शरद पवार सक्रिय राजकारणातून निवृत्त होणार होते. त्यानंतर सुप्रिया सुळे या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष होणार होत्या. तसेच केंद्रामध्ये त्यांना मंत्रीपद दिले जाणार होते. दुसरीकडे, राष्ट्रवादी फुटीचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयांमध्ये अजूनही प्रलंबित आहे. या संदर्भातील सुनावणी पुढील महिन्यामध्ये होणार होती. त्यानंतर दोन्ही पक्ष एकत्र येणार होते, अशी माहिती राष्ट्रवादीच्या विश्वसनीय सूत्रांनी दिली.

# कुत्रे वासातून ओळखतात आजार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कुत्र्यांची वास घेण्याची क्षमता अत्यंत विलक्षण असून ती माणसांच्या क्षमतेपेक्षा कितीतरी पटीने जास्त असते. त्यामुळे आजार किंवा ताणतणावामुळे मानवी शरीरात होणारे सूक्ष्म रासायनिक बदल ओळखू शकतात.

कर्करोगाच्या पेशींमधून शरीरात काही विशिष्ट वायुरूप सेंद्रिय संयुगे स्रवतात, जी माणसांच्या इंद्रियांना जाणवत नाहीत. मात्र, कुत्रे ती सहज ओळखू शकतात. नार्कोलेप्सी झटके येणारा मज्जासंस्थेशी संबंधित आजार आहे. रक्तातील साखर कमी झाल्यावर मानवी श्वासामध्ये आयसोप्रिन सारखे काही रासायनिक घटक निर्माण होतात, ते कुत्रे सहज ओळखू शकतात. निरीक्षणांनुसार झटका येण्याआधी मालकाच्या वासात, वर्तनात किंवा हालचालींमध्ये होणारे सूक्ष्म बदल कुत्र्यांना जाणवतात. मानवी शरीरातून भीती आणि ताणतणावाच्या वेळी ॲड्रेनालिन व कॉर्टिसोलसारखे हार्मोन्स स्रवतात, जे कुत्रे ओळखू शकतात.

# डीमार्टला कमी किंमतीत कसा होतो फायदा ?

## 'या' खास स्ट्रॅटर्जीमुळे परवडणाऱ्या किमतीत परवडते सामान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

डीमार्टमधून महिन्याभराचे किराणा माल सर्वसामान्य नोकरदारांच्या पैशांची भरपूर्ण बचत होते. मात्र, डीमार्ट इतक्या कमी किमतीत वस्तू कसे विकते? आणि स्वस्तात वस्तू, सामान विकून डीमार्ट स्वतः फायदा कसे कमावते? चला जाणून घेऊया...

डीमार्ट देशभरात परवडणाऱ्या दरातील दैंनदिन गरजेच्या वस्तू, किराणा माल विकण्यासाठी प्रसिद्ध आहे. आजच्या ऑनलाइन युगातही डीमार्ट अनेक प्रमुख ई- कॉमर्स प्लॅटफॉर्मशी स्पर्धा करत आहे. वस्तू अतिशय परवडणाऱ्या किमतीत मिळतात. याशिवाय एक मनोरंजक तथ्य म्हणजे की ज्या भागात डीमार्ट उघडते त्या भागात जमिनीच्या किमती वाढतात. डीमार्टने उज्ज्वल भविष्य असलेल्या क्षेत्रात गुंतवणूक केली आहे असे लोकांचे मत आहे.

डीमार्टमागील मास्टरमाइंड राधाकिशन दमानींचा ब्रेन डीमार्टच्या यशामागील खरे कारण आहे. शेअर मार्केटचे 'बुल' दिवंगत राकेश जुनझुनवाला यांना आपला गुरु मानणारे राधाकिशन दमानी देशातील धनाढ्य व्यक्तींपैकी आहेत.

२०२६ च्या सुरुवातीपर्यंत, राधाकिशन दमानी यांची एकूण संपत्ती २ लाख कोटी रुपये म्हणजे सुमारे $१७- २६ अब्जपेक्षा जास्त असल्याचा अंदाज आहे. राधाकिशन दमानी यांनी फक्त १२वी पर्यंत शिक्षण घेतले. तरीही, त्यांच्या कुशाग्र बुद्धिमत्ता आणि व्यावसायिक कौशल्यामुळे आता त्यांच्याकडे अब्जावधींची मालमत्ता आहे. एकेकाळी शेअर बाजारातील अनुभवी दमानी यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतल्यावर सुरुवातीला त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. १९९९ मध्ये नेरुळमध्ये पहिली फ्रँचायझी घेतली. ज्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर त्यांनी बोअरवेल बांधण्यास सुरुवात केली. मात्र, तिथेही त्यांना अपयश आले. मग २००२ वर्ष त्यांच्यासाठी गेमचेंजर बनला. मुंबईत त्यांनी पहिले डीमार्ट स्टोअर उघडले. मात्र, इथे त्यांनी वेगळा खेळ खेळात भाड्याच्या जागेत डीमार्ट स्टोअर्स न उघडता थेट जागा खरेदी करून डीमार्ट स्टोअर उघडले ज्याची संख्या आता देशभरात ३००हुन अधिक आहेत. म्हणजे दमानींकडे फक्त डीमार्ट स्टोअर्सच नाहीत तर संपूर्ण भारतात ३०० मोठ्या जागा नाही तर, ११ राज्यांमध्ये पसरलेली दुकाने आहेत. स्वस्त किराणामाल विकून डीमार्टला नफा कसा होतो ? आता स्वस्तात सामान विकण्याबद्दल बोलायचे तर, यामागचे सिक्रेटही दमानींच्या खाजगी दुकानांशी जोडलेले आहे. डीमार्ट भाड्याच्या जागेत दुकाने उघडत नाही, ज्यामुळे त्यांचा चालू खर्च लक्षणीयरीत्या कमी होतो. भाड्याच्या जागेऐवजी स्वतःच्या मालकीच्या जागेवर डीमार्ट स्टोअर उघडले आहेत. ज्यामुळे मासिक भाडे भरावे लागत नाही आणि या बचतीचा फायदा ग्राहकांनाही होतो. महिन्याभरात सगळा माल विकला जातो.

# डेस्टिनेशन सायन्स

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दहावी- बारावीनंतर करिअरची कोणती वाट निवडायची असा प्रश्न पडतो. विज्ञान शाखेतल्या प्रत्येक विद्यार्थ्याला डॉक्टर किंवा इंजिनिअर होता येत नाही. मात्र, त्यामुळे निराश होण्याची आवश्यकता नाही. या शाखेतील विद्यार्थ्यांसाठी इतर अनेक क्षेत्रांमध्ये संधी उपलब्ध आहेत. गणितात प्रावीण्य असणारे विद्यार्थी पॉलिटेक्निकची निवड करू शकतात. तुम्हाला बँकेच्या परीक्षाही देता येतील. यासोबतच नौदल, लष्कर आणि हवाई दलातल्या नोकऱ्यांसाठी अर्ज करता येईल. एमबीबीएस करणे शक्य नसेल तर होमिओपॅथी, आयुर्वेद यासारख्या पर्यायांची निवड करता येईल. नर्सिंग, बी. फार्म. यासारखे पर्यायही आहेत. जेईई परीक्षा देणे कठीण वाटत असेल तर राज्याच्या इंजिनिअरिंग प्रवेश परीक्षा देता येतील. सिव्हिल, इलेक्ट्रॉनिक, मेकॅनिकल यांसारख्या पारंपरिक शाखांसोबतच बायोटेक, पर्यावरण आदी शाखांमध्येही संधी आहेत. अशा नव्या वाटा निवडण्याकडे विद्यार्थ्यांचा कल दिसून येतो.

# चांदीचा खरा मालक कोण आहे?

## 'या' १० देशांमध्ये जगातील सर्वाधिक चांदीचा साठा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



गुंतवणूकदारांमध्ये आता सोन्यापेक्षा चांदी अधिक आकर्षक पर्याय बनत आहे. या पाशर्वभूमीवर सर्वाधिक चांदीचा साठा असलेले जगातील टॉप १० देश. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या आकडेवारीनुसार (अंदाजित मेट्रिक टन) जगातील चांदीचा साठा काही निवडक देशांकडे केंद्रित आहे. हे देश केवळ खाणकामाच्या बाबतीतच मजबूत नाहीत, तर चांदीच्या किमतींमुळे त्यांचे सामरिक महत्त्वही वाढले आहे.

**पेरू सुमारे १, ४०, ००० मेट्रिक टन**

चांदीच्या साठ्यांच्या बाबतीत पेरू जगात पहिल्या क्रमांकावर आहे. येथे बऱ्याच काळापासून चांदीचे उत्खनन मोठ्या प्रमाणावर केले जात आहे.

**पोलंड सुमारे १, ००, ००० मेट्रिक टन**

पोलंड हा युरोपमधील चांदीच्या सर्वात मोठ्या उत्पादकांपैकी एक आहे आणि त्याच्याकडे प्रचंड साठा आहे.

**ऑस्ट्रेलिया सुमारे ९४, ००० मेट्रिक टन**

ऑस्ट्रेलिया खनिज संपत्तीने समृद्ध देश आहे. चांदीचा देखील येथे चांगला साठा आहे.

**रशिया सुमारे ९२, ००० मेट्रिक टन**

रशियाकडे चांदीचा मोठा साठा आहे, ज्यामुळे तो जागतिक बाजारपेठेत मजबूत आहे.

**चीन सुमारे ७२, ००० मेट्रिक टन**

चीन हा केवळ एक मोठा ग्राहकच नाही, तर चांदीच्या साठ्याच्या बाबतीतही अव्वल देशांपैकी एक आहे.

**मेक्सिको सुमारे ३७, ००० मेट्रिक टन**

मेक्सिको पारंपारिकपणे चांदीच्या उत्पादनासाठी ओळखला जातो आणि अजूनही तेथे मोठा साठा आहे.

**चिली सुमारे २६, ००० मेट्रिक टन**

चिली प्रामुख्याने तांब्यासाठी प्रसिद्ध आहे. मात्र, चांदीचा चांगला साठाही येथे आढळतो.

**युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका (यूएसए) सुमारे २३, ००० मेट्रिक टन**

अमेरिकेकडे चांदीचा मजबूत साठा देखील आहे, जो त्याच्या औद्योगिक वापरात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो.

**बोलिव्हिया सुमारे २२, ००० मेट्रिक टन**

दक्षिण अमेरिकेतील हा देश चांदीच्या खाणीसाठी ओळखला जातो.

**भारत सुमारे ८, ००० मेट्रिक टन**

या यादीत भारत १०व्या स्थानावर आहे. साठा मर्यादित असला तरी चांदीची देशांतर्गत मागणी झपाट्याने वाढत आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# पिता चलाते हैं दुकान और बेटी बनी आयपीएस

## १११ वीं रैंक लाकर रच दिया इतिहास

**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संघ लोक सेवा आयोग द्वारा आयोजित सिविल सेवा परीक्षा पास करने के लिए मेहनत और लगन की आवश्यकता होती है, ना कि संसाधनों की। इस बात को सच कर दिखाया उत्तर प्रदेश के बनारस की रहने वाली आरफा उस्मानी ने। आरफा मछोदरी की कोयला बाजार की रहने वाली हैं । उनके पिता मोहम्मद असलम खान दालमंडी में दुकान चलाते हैं और केवल १०वीं पास हैं लेकिन आरफा ने यूपीएससी सिविल सेवा परीक्षा में १११वीं रैंक लाकर इतिहास रच दिया।

**आईपीएस आरफा उस्मानी स्कूली शिक्षा**

आईपीएस आरफा उस्मानी ने 8वीं कक्षा तक कृष्ण मूर्ति फाउंडेशन स्कूल से पढ़ाई की और १०वीं सेंट जॉन्स स्कूल से पूरा किया। १०वीं में २०१० में आयसीएसई बोर्ड से पूर्वांचल में पहली रैंक थी। वहीं १२वीं डीपीएस वाराणसी से पूरा किया ।

**आयआयटी से ग्रेजुएट**

आरफा उस्मानी ने आयआयटी-बीएचयू से मैथमैटिक्स एंड कंप्यूटिंग की पढ़ाई की। इसके बाद बैंगलोर में सॉफ्टवेयर इंजीनियर की नौकरी भी की।



इस नौकरी के दौरान उनके मन में यूपीएससी सिविल सेवा परीक्षा के बारे में विचार आया।

**प्रेरक है कहानी**

आईपीएस आरफा उस्मानी की कहानी युवाओं के लिए प्रेरक है। वह कहती हैं कि यूपीएससी सिविल सेवा परीक्षा क्रैक करने के लिए उन्होंने चार साल तक सोशल मीडिया से दूरी बनाए रखी।

**ऐसा है परिवार**

आरफा के बड़े भाई मो. शादान खान आयआयटी-आयआयएम से पास आउट हैं और रिजर्व बैंक मुंबई में मैनेजर हैं। वहीं, छोटी बहन आलिया उस्मानी बीटेक के बाद नौकरी कर रही है।

**चौथे प्रयास में सफलता**

सिविल सेवा परीक्षा के चौथे प्रयास में आरफा उस्मानी को सफलता मिली। तीसरे प्रयास में वह इंटरव्यू तक पहुंची थीं। अरफा स्कूल से ही बास्केटबॉल की बेहतरीन खिलाड़ी थीं।

# ‘नॅशनल क्रश’ गिरीजा ओकचा काळ्या ड्रेसमधील लूक

## झोपाळ्यावर बसलेल्या फोटोंची चर्चा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गिरीजा केवळ तिच्या सौंदर्यासाठीच नाही, तर सहज आणि वास्तववादी अभिनयासाठीही ओळखली जाते. ‘नॅशनल क्रश’ फेम मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री गिरीजा ओक-गोडबोलेच्या नव्या फोटोंची सध्या इन्स्टाग्रामवर चर्चा सुरू आहे.

या फोटोंमध्ये गिरीजाने काळ्या रंगाचा प्लेन सुंदर ड्रेस परिधान केला आहे. गिरीजाने हे फोटोशूट सायली मराठेच्या ‘हाऊस ऑफ आद्या’ या ब्रॅण्डसाठी केले आहे. झोपाळ्यावर बसून दिलेल्या गिरीजाच्या खास पोजनी चाहत्यांना भुरळ घातली आहे. गिरीजा केवळ तिच्या सौंदर्यासाठीच नाही, तर सहज आणि वास्तववादी अभिनयासाठीही ओळखली जाते. गिरीजाने अभिनयाच्या जोरावर मोठ्या पडद्यासह वेब सीरिजच्या विश्वातही आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

झी मराठीवरील ‘लज्जा’ मालिकेतील गिरीजाची ‘मनस्वी’ ही भूमिका आजही प्रेक्षकांच्या मनात घर करून आहे.



# दालचिनी सेवनाची पद्धत कोणती?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



दालचिनी ही उष्ण आणि अग्नी-वर्धक आहे, जी शरीरातील कफ काढून टाकण्यास आणि मंद झालेली पचनशक्ती सक्रिय करण्यास मदत करते. मात्र, सेवनाची योग्य पद्धत कोणती? हे जाणून घेऊयात. **सतत थकवा** : सतत थकवा, शरीर थंड पडणे किंवा जकडल्यासारखे वाटत असेल, तर दालचिनी जल हा एक उत्तम नैसर्गिक उपाय आहे. **रक्तभिसरण आणि साखर** : हे जल शरीरातील रक्तभिसरण सक्रिय करते आणिरक्तातील साखरेचे प्रमाण संतुलित राखण्यास मदत करते. **वजन नियंत्रण** : ज्यांना वारंवार सुस्ती येते किंवा वजन वाढण्याची प्रवृत्ती आहे, त्यांच्यासाठी हे ‘कफ-भेदी जल’ अत्यंत परिणामकारक ठरते. **बनवण्याची विधी** : एक ग्लास पाण्यात दालचिनीचा छोटा तुकडा टाकून पाणी अर्धे होईपर्यंत उकळावे आणि नंतर ते कोमट असताना गाळून घ्यावे. **सेवन पद्धत** : हे पाणी सकाळी रिकाम्या पोटी घ्यावे. साधारणपणे १४ ते २१ दिवस याचे सेवन केल्यास शरीरात हलकेपणा आणि ऊर्जा जाणवते. **कोणासाठी उपयुक्त** : कफ प्रवृत्ती असलेल्या व्यक्ती, कमकुवत पचनशक्ती आणि सकाळी उठल्यावर भारीपणा जाणवणाऱ्या लोकांसाठी हे विशेष फायदेशीर आहे . **सावधानता** : पित्त प्रवृत्तीच्या व्यक्तींनी याचे सेवन मर्यादित ठेवावे, तसेच उष्णतेचा त्रास किंवा गर्भधारणेमध्ये तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. **संतुलित अग्नी** : जेव्हा शरीरातील ‘अग्नी’ संतुद्रित असतो, तेव्हा शरीर स्वतःच रोगांशी लढण्यास सज्ज होते.































# संत शिरोमणी रविदास महाराज :
## समतेचा, मानवतेचा आणि आत्मबोधाचा महामंत्र


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**जयंती विशेष!**

भारतीय संतपरंपरेतील तेजस्वी नक्षत्र म्हणजे संत शिरोमणी रविदास महाराज. सामाजिक विषमता, जातिभेद आणि अज्ञानाच्या अंधारात अडकलेल्या समाजाला समतेचा, मानवतेचा आणि आत्मसन्मानाचा प्रकाश देणारे संत म्हणून त्यांचे स्थान अत्युच्च आहे. संत रविदास महाराज यांनी आपल्या विचारांनी आणि वाणीतून समाजाला माणुसकीचा खरा अर्थ शिकवला. “ मन चंगा तो कठौती में गंगा ” हा त्यांचा प्रसिद्ध अभंग आजही अंतःकरण शुद्धतेचे महत्त्व अधोरेखित करतो. बाह्य आडंबरापेक्षा अंतर्मन पवित्र असावे, हा त्यांचा ठाम विचार होता. रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी संत रविदास महाराज जयंती. यानिमित्त त्यांच्या कार्यास उजाळा.

संत शिरोमणी रविदास महाराजांचा जन्म उत्तर भारतातील काशी (वाराणसी) येथे झाला. त्यांचा व्यवसाय चर्मकाराचा होता. त्यांची विचारधारा अत्यंत उच्च आणि व्यापक होती. त्या काळात जातपात, उच्च- नीचतेच्या भिंती प्रचंड मजबूत होत्या. मात्र, संत रविदास महाराजांनी या भिंती तोडण्याचे धाडस केले.

**“ मन चंगा तो कठौती में गंगा ”**



“ माणूस माणसाने ओळखावा, जातीने नव्हे ” हा संदेश त्यांनी दिला. त्यांची भक्ती केवळ देवापुरती मर्यादित नव्हती, तर ती मानवतेशी जोडलेली होती. त्यांनी कर्मकांड, अंधश्रद्धा यांना फाटा देत, अंतःकरणातील शुद्ध भावनांना महत्त्व दिले. संत रविदास महाराज हे निर्भीड समाजसुधारक होते. त्यांनी शोषित, वंचित, उपेक्षित घटकांना आत्मविश्वास दिला. समाजातील दुर्बल घटकांनी शिक्षण, ज्ञान आणि आत्मसन्मानाच्या बळावर उभे राहावे, असा त्यांचा आग्रह होता. त्यांच्या विचारांचा प्रभाव केवळ सामान्य जनतेवरच नव्हे, तर मीरा बाईंसारख्या महान संत-कवयित्रीवरही पडलेला दिसतो. संत मीराबाईंनी त्यांना आपला गुरू मानले, हे त्यांच्या आध्यात्मिक उंचीचे प्रतीक आहे.

संत रविदास महाराजांनी मांडलेली ‘बेगमपुरा’ ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची आहे. अन्याय, भेदभाव, भीती आणि दुःख नसलेले आदर्श समाजराज्य त्यांनी आपल्या कल्पनेत उभे केले. आजच्या लोकशाही, समतावादी समाजाच्या संकल्पनेचे बीज त्यांच्या विचारांतूनच दिसून येते. आजही समाजात जातीयतेची, द्वेषाची आणि असमानतेची जखम दिसते. अशा वेळी संत रविदासांचे विचार म्हणजे समाजासाठी औषध ठरू शकतात. संत रविदास हे केवळ एका समाजाचे किंवा एका धर्माचे नव्हते. ते संपूर्ण मानवतेचे संत होते. त्यांचा संदेश आजही तितकाच जिवंत, तितकाच प्रेरणादायी आहे.



## माघ पौर्णिमा : श्रद्धा, पुण्य आणि आत्मशुद्धीचा पावन उत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय सनातन परंपरेत प्रत्येक पौर्णिमेला विशेष महत्त्व आहे. मात्र, माघ महिन्यातील पौर्णिमा ही केवळ तिथी नसून, ती श्रद्धा, संयम, तपश्चर्या आणि आत्मिक उन्नतीचा महासंगम आहे. मकर संक्रांतीनंतर सुरू झालेला माघ महिना धार्मिक दृष्ट्या अत्यंत पवित्र मानला जातो. या महिन्यात केलेले स्नान, दान, जप-तप आणि उपासना यांचे फळ अनेकपटीने मिळते, असे शास्त्रात सांगितले आहे. रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी माघ पौर्णिमा. यानिमित्त विशेष.

माघ पौर्णिमेचे महत्त्व प्रामुख्याने पवित्र नदीस्नानाशी जोडलेले आहे. गंगा, यमुना, गोदावरी, कृष्णा, नर्मदा, कावेरी यांसारख्या नद्यांमध्ये या दिवशी स्नान केल्यास सर्व पापांचा क्षय होतो, अशी श्रद्धा आहे. प्रयागराज येथे त्रिवेणी संगमावर होणारे माघ स्नान हे तर विशेष पुण्यकारक मानले जाते. या दिवशी लाखो भाविक पहाटेपासून नदीकाठी उपस्थित राहून स्नान, पूजा आणि दान करतात.

माघ पौर्णिमा ही ‘माघ व्रताची सांगता’ मानली जाते. माघ महिन्यात अनेक भाविक नियमपूर्वक ब्रह्मचर्य, सात्त्विक आहार, उपवास, हरिनामस्मरण आणि दानधर्म करतात. पौर्णिमेच्या दिवशी हे व्रत पूर्णत्वास जाते. या दिवशी केलेले दानजसे अन्नदान, वस्त्रदान, तिळदान, गूळ, धान्य, तांदूळ, तूप इत्यादीअत्यंत पुण्यदायी मानले जाते.

पौराणिक कथांनुसार, भगवान विष्णूंची विशेष कृपा माघ पौर्णिमेला लाभते. त्यामुळे अनेक ठिकाणी विष्णुपूजन, सत्यनारायण पूजा, हरिपाठ, भजन-कीर्तन यांचे आयोजन केले जाते. काही ठिकाणी देवी-देवतांचे जत्रोत्सव, पालखी सोहळे आणि धार्मिक प्रवचनांचे कार्यक्रमही होतात. या दिवशी केलेली उपासना मनाला शांतता देणारी आणि जीवनाला योग्य दिशा देणारी ठरते.

माघ पौर्णिमेला चंद्राचे विशेष महत्त्व आहे. पौर्णिमेचा पूर्ण चंद्र मन, भावना आणि विचारांवर सकारात्मक परिणाम करतो, असे मानले जाते. त्यामुळे ध्यान, जप, मंत्रसाधना यासाठी हा दिवस अत्यंत उपयुक्त आहे. अनेक साधक या दिवशी मौनव्रत, ध्यानसाधना किंवा नामस्मरण करून आत्मिक उन्नतीचा मार्ग स्वीकारतात.

सामाजिक दृष्ट्याही माघ पौर्णिमेचे महत्त्व मोठे आहे. या दिवशी गरजूंना मदत करणे, अन्नछत्र, पाणपोई, वस्त्रवाटप करणे, वृद्धाश्रम व अनाथालयांना मदत करणेहे सर्व कार्य समाजात करुणा, सेवा आणि माणुसकीची भावना वाढवतात. धर्म केवळ कर्मकांडापुरता मर्यादित नसून, तो सेवेतूनच पूर्णत्वास जातो, ही शिकवण माघ पौर्णिमा देते.

आजच्या धकाधकीच्या जीवनात माघ पौर्णिमा आपल्याला थांबून आत्मपरीक्षण करण्याची संधी देते. आपल्या वागणुकीत शुद्धता, विचारांत सकारात्मकता आणि कृतीत सद्भावना आणण्याचा संकल्प या दिवशी करावा. बाह्य शुद्धतेसोबत अंतःकरणाची शुद्धता साधणे हेच या पावन तिथीचे खरे सार आहे.

शेवटी, माघ पौर्णिमा ही केवळ धार्मिक उत्सव न राहता, जीवन शुद्ध करणारा, मन प्रसन्न करणारा आणि समाजाशी नाते दृढ करणारा पवित्र दिवस आहे. या दिवशी श्रद्धेने केलेली प्रत्येक सत्कृती आपल्याला आत्मिक समाधान आणि ईश्वरी कृपेच्या अधिक जवळ नेणारी ठरते. म्हणूनच माघ पौर्णिमेचा हा पावन योग भक्ती, सेवा आणि सद्विचारांनी साजरा करणे हेच खरे फलित आहे.

## आग्नेय दिशेला “घराचे इंजिन” का म्हणतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वास्तुशास्त्रात आग्नेय दिशा ही अग्नी तत्त्वाची दिशा मानली जाते. हीच दिशा घराच्या क्रियाशक्तीचे, उत्पन्नाचे, आरोग्याचे आणि निर्णयक्षमतेचे केंद्र आहे. म्हणूनच आचार्यांनी आग्नेय दिशेला “घराचे इंजिन” म्हटले आहे.

**आग्नेय दोष म्हणजे काय..?**

जेव्हा आग्नेय दिशेत अग्नी तत्त्वाऐवजी जल तत्त्व वाढते किंवा जड, स्थिर, अशुद्ध रचना येते तेव्हा आग्नेय दोष निर्माण होतो.

आग्नेय दोष निर्माण होण्याची प्रमुख कारणे आग्नेयेत टॉयलेट, बाथरूम, विहिर, आग्नेयेत बोअरवेल, पाण्याची टाकी, आग्नेय कट (कोपरा तुटलेला), आग्नेयेत बेडरूम, आग्नेयेत सेप्टिक टँक, स्वयंपाकघर आग्नेयेत नसणे, आग्नेयेत निळे, काळे रंग.

**आग्नेय दोषाचे परिणाम (शास्त्रानुसार)**

**आर्थिक परिणाम** : पैसा येतो पण टिकत नाही. खर्च वाढतो, बचत होत नाही. व्यवसायात सतत अडथळे, कर्ज वाढणे.

**कारण** : अग्नी तत्त्व कमजोर झाले की अर्थचक्र विस्कळीत होते

**आरोग्यावर परिणाम**

महिलांचे आरोग्य बिघडणे, हार्मोनल प्रॉब्लेम, पोटाचे विकार, डायबेटीस, ॲसिडिटी, सर्जरी. **कारण:** आग्नेयाचा थेट संबंध पचन व ऊर्जेशी आहे.

**मानसिक व कौटुंबिक परिणाम**

घरात चिडचिड, पती-पत्नी वाद, निर्णयात गोंधळ, आत्मविश्वास कमी होणे. **कारण :** घराचे इंजिन असंतुलित झालेले असते.

**काम व प्रगतीवर परिणाम**

मेहनत असूनही यश न मिळणे, कामात सातत्य नसणे, उद्योग चालू असूनही वाढ न होणे. **कारण :** क्रियाशक्तीच अडथळलेली असते.

**आग्नेय दोष निवारण उपाय (शास्त्रोक्त)**

अग्नी तत्त्व वाढवणे, आग्नेयेत स्वयंपाकघर ठेवा, गॅस, चूल, ओव्हन वापरात ठेवा, दिवा/अखंड ज्योत प्रज्वलित करा, लाल रंगाचा बल्ब.

जल तत्त्व कमी करणे

आग्नेयेत पाणी ठेवणे टाळा, बाथरूम असल्यास नेहमी कोरडे ठेवा, मीठाच्या वाट्या ठेवा (ऊर्जा शोषणासाठी)

**रंग उपचार**

लाल, केशरी, तांबूस, पिवळे रंग, निळा, काळा, राखाडी टाळा

**धातू व प्रतीक**

- ताब्याचा सूर्य / अग्नी यंत्र
- पिरॅमिड किंवा अग्नि प्रतीक
- रेड कार्नेलियन

**वास्तुशांती व हवन**

- आग्नेय दोषासाठी अग्निहोत्र अत्यंत प्रभावी
- अग्नी बीज मंत्रांचा जप

**आग्नेय कट असल्यास**

- बाह्य बांधकामाने कोपरा पूर्ण करणे
- लाल दगड / टाइल्स वापरणे
- अग्नि यंत्र स्थापनेने उर्जा वाढवणे

अग्नीस्थानी दोष असल्यास धन, आरोग्य व अन्न तीनही बाधित होतात..

इंजिन बिघडले तर गाडी थांबते, आग्नेय दोष असेल तर जीवन अडखळते.

म्हणून आग्नेय शुद्ध ठेवा, घर आपोआप प्रगती करू लागेल

# मंगलागिरीच्या या अनाकलनीय मंदिराचे रहस्य
## गुळाचा नैवेद्य अर्पण करताना प्रत्यक्ष येतो ‘गटक-गटक’ आवाज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आंध्र प्रदेशातील विजयवाड्याच्या अगदी जवळ असलेल्या मंगलागिरी पर्वतावर पाऊल ठेवले की, तिथल्या हवेतच एक वेगळी गूढता जाणवते. या ठिकाणी गेल्यावर याचा अनुभव येतो. याचे कारण म्हणजे हे केवळ एक पुरातन मंदिर नाही, तर डोळ्यांदेखत घडणाऱ्या चमत्कारांचे जिवंत साक्षीदार म्हणून हे मंदिर प्रसिद्ध आहे. या क्षेत्राचे अधिष्ठाता भगवान नरसिंह हे ‘ पनाकला नरसिम्हास्वामी ’ म्हणून जगभर प्रसिद्ध आहेत. मात्र, हे नाव त्यांना का पडले, याच्या मागे एक अत्यंत रंजक कथा आणि विज्ञानाच्या तर्कांना आव्हान देणारे काही अनुभव दडलेले आहेत.

या मंदिराचे सर्वात मोठे रहस्य म्हणजे येथील देवाची मूर्ती. खरे तर आपण ज्याला सामान्य भाषेत ‘मूर्ती’ म्हणतो, तशी ती पूर्ण मानवी रूपात नाही. येथे भगवान नरसिंहाचा केवळ चेहरा किंवा ‘मुख’ पाहायला



मिळते. हे मुख पाषाणाचे असून त्याचे तोंड पूर्णपणे उघडलेले आहे. मूर्तीचे हे रूप इतके नैसर्गिक वाटते की, जणू भगवान नरसिंह स्वतः तृप्त होण्यासाठी भक्ताची वाट पाहत आहेत. भक्तांनी आणलेले ‘पनाकम’ (गुळाचे पाणी) जेव्हा पुजारी एका नळीद्वारे किंवा पात्राद्वारे त्या मुखात ओततात, तेव्हा जे घडते ते थक्क करणारे असते. पाणी आत जात असताना उपस्थित भाविकांना ‘गटक-गटक’ असा स्पष्ट आवाज ऐकू येतो, जणू एखादी व्यक्ती तहानेने व्याकुळ होऊन गटागटा पाणी पीत आहे. मात्र, आश्चर्याची गोष्ट म्हणजे, तुम्ही कितीही पाणी अर्पण करा, देव त्यातील केवळ



बरोबर अर्धा भाग स्वीकारतात आणि उरलेला अर्धा भाग मूर्तीच्या मुखातून अचानक बाहेर येतो. हे ५० टक्क्याचे प्रमाण कधीच चुकत नाही, मग ते पाणी एक छोटा पेला असो वा एखाद्या श्रीमंत भक्ताने अर्पण केलेले शेकडो लिटर.

या विधीमागची पौराणिक कथा मोठी विलक्षण आहे. सत्ययुगात ‘नम्युची’ नावाच्या एका बलाढ्य राक्षसाने ब्रह्मदेवाकडून असा वर मिळवला होता, की जगातील कोणत्याही ‘ओल्या’ किंवा ‘कोरड्या’ वस्तूने त्याचा वध होऊ शकणार नाही. या वराच्या अहंकाराने त्याने देवांना छळायला सुरुवात केली. अखेर भगवान विष्णूंनी नरसिंह अवतार धारण केला आणि समुद्राच्या ‘फेसाचा’ (जो पूर्ण ओलाही नाही आणि कोरडाही नाही) वापर करून त्याचा वध केला. मात्र, या वधानंतर नरसिंहाचा क्रोध शांतच होईना. त्यांचा हा दाह शांत करण्यासाठी सर्व देवांनी त्यांना ‘अमृताचा’ नैवेद्य दाखविला. त्रेतायुगात तूप, द्वापारयुगात दूध आणि आता या कलियुगामध्ये भक्तांच्या श्रद्धेनुसार ‘गुळाचे पाणी’ अर्पण करण्याची परंपरा सुरू झाली. असे मानले जाते, की गुळाच्या पाण्याचे अर्पण केल्याने भगवंतांचा क्रोध शांत होतो आणि ते भक्तांवर प्रसन्न होतात. या मंदिराच्या रहस्याची दुसरी बाजू म्हणजे इथली स्वच्छता. साध्या गुळाच्या एका थेंबावर मुंग्यांची रांग लागते. मात्र, मंगलागिरी मंदिरात दररोज हजारो लिटर गुळाच्या पाण्याचा अभिषेक होऊनही तिथे एकही मुंगी किंवा माशी फिरकत नाही. हे निसर्गनियमाला दिलेले एक मोठे आव्हान आहे. काही तज्ज्ञांच्या मते, मंगलागिरी पर्वत हा एक ‘सुप्त ज्वालामुखी’ आहे अशी मान्यता आहे. प्राचीन काळी आपल्या पूर्वजांनी ज्वालामुखीतील घातक वायूंचा प्रभाव कमी करण्यासाठी ही गुळाचे पाणी अर्पण करण्याची पद्धत सुरू केली असावी. कारण गुळामध्ये रासायनिकदृष्ट्या हे वायू शांत करण्याची क्षमता असते. म्हणजेच, आपली ही आध्यात्मिक परंपरा विज्ञानाच्या एका भक्कम पायावर उभी आहे. (त्या ठिकाणी प्रचलित असलेल्या कथेनुसार वर नमूद केल्याप्रमाणेच सांगितले जाते.)

स्थापत्यशास्त्राचा विचार केला, तर टेकडीच्या पायथ्याशी असलेले लक्ष्मी नरसिंह मंदिर आणि त्याचे ‘गलि गोपुरम’ (वाऱ्याचे गोपुरम) १५३ फूट उंच असून ते भव्यतेने सर्वांना आकर्षित करते. १५व्या शतकात बांधलेले हे गोपुरम दक्षिण भारतातील सर्वात उंच गोपुरांपैकी एक आहे. रात्रीच्या वेळी या पर्वतावर कोणालाही थांबण्याची परवानगी नसते. स्थानिक लोकांच्या मते, रात्रीच्या प्रहरी प्रत्यक्ष देव आणि महान ऋषी- मुनी सूक्ष्म रूपात येथे येऊन भगवंताची आराधना करतात. मंगलागिरीचा हा अनुभव केवळ शब्दांत वाचण्यासारखा नाही, तर तो तिथे जाऊन जगण्यासारखा आहे. तिथूनच खऱ्या अर्थाने या ‘पनाकला नरसिंहाची’ प्रचिती सुरू होते.

# ‘जनी सर्व सुखी असा कोण आहे’

**मना सज्जना...**

**परम स्नेही मित्रहो,**

आपण समर्थ रामदास स्वामींच्या मनाचे श्लोकमधील दहाव्या श्लोकातील अतिशय वास्तववादी, अंतर्मुख करणारा गर्भित अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करूया.

**जनी सर्व सुखी असा कोण आहे ।**
**विचारी मना तू चि शोधून पाहे ।**
**मना त्वां चि रे पूर्व संचित केले ।**
**तया सारखे भोगणे प्राप्त झाले ॥ १० ॥**

मागील नवव्या श्लोकात समर्थांनी मनाला एक कठोर, पण शंकामुक्त करणारा संदेश दिला होता

**‘देह दुःख हे सुख मानीत जावे’**

म्हणजे दुःख टाळण्याचा हट्ट न करता त्याकडे पाहण्याची आपली दृष्टी बदलावी. तरीही मनुष्यस्वभाव असा आहे, की तो सतत सुखाच्या शोधातच असतो. सुख ही संकल्पना प्रत्येकासाठी वेगळी असते. कुणासाठी पैसा म्हणजे सुख, कुणासाठी पद, प्रतिष्ठा, नावलौकिक म्हणजे सुख, कुणासाठी कुटुंब, परिवार, धनधान्य, संपत्ती म्हणजे सुख, तर कुणासाठी आरोग्य, शांतता किंवा प्रभू नामाचे चिंतन हेच खरे सुख असते. पण गंमत अशी, की

आपल्याला जे सुख वाटते, तेच दुसऱ्याला सुख वाटेलच असे नाही. आणि दुसऱ्याचे सुख पाहून अनेकदा आपल्या मनात नकळत असूया, तुलना आणि न्यूनगंड निर्माण होतो. यातून सुख वाढत नाही; उलट दुःख अधिक गहिरे होते. म्हणून समर्थ थेट मनालाच प्रश्न विचारतात

‘जनी सर्व सुखी असा कोण आहे?’ मनाचे श्लोक म्हणजे मन या विषयाला स्वतंत्र व्यक्ती मानून त्याच्याशी चाललेला हृदयसंवाद आहे. मनाच्या अंतर्मनात उमटणाऱ्या प्रश्नांना समर्थ उत्तर देतात, कधी प्रश्न विचारूनच मनाला जागे करतात. हा प्रश्न तसाच आहेथेट, आरसा दाखविणारा. आजूबाजूला पाहा बाहेरून हसणारे चेहरे, संपन्न दिसणारी घरे, यशस्वी वाटणारी माणसे या प्रत्येकाच्या आयुष्यात कुठे ना कुठे दुःखाची एक न दिसणारी कसर असतेच. कोणाच्या आयुष्यात दुःख कमी, कोणाच्या आयुष्यात अधिक पण दुःखरहित जीवन कुणालाच लाभलेले नाही. हे वास्तव मनाने एकदा स्वीकारले,

की जीवनाचा प्रवास अधिक सुलभ होतो, हलका होतो. समर्थ पुढे म्हणतात

**‘विचारी मना तूचि शोधून पाहे’**

येथे समर्थ आपल्याला बाहेर शोधायला सांगत नाहीत, तर स्वतःकडे



वळायला सांगतात. थोडा थांब मनन कर चिंतन कर आपल्या आयुष्यातील सुख-दुःखांचे धागेदोरे नेमके कुठे जोडले आहेत, हे कोणत्या कर्मांचे पडसाद आहेत, याचा प्रामाणिक शोध घे. आणि मग समर्थ अत्यंत निर्णायक विधान करतात

**‘मना त्वां चि रे पूर्व संचित केले ।**
**तया सारखे भोगणे प्राप्त झाले’**

आज आपण जे काही भोगतो आहोत सुख असो वा दुःख ते कोणीतरी आपल्यावर लादलेले नाही, तर आपल्या पूर्वसंचित कर्मांचेच फळ आहे. आपणच घातलेल्या आरोळीचा हा प्रतिध्वनी आहे इकोप्रमाणे आपल्या चांगल्यावाईट कर्मांची फळे कमीअधिक कालांतराने आपल्यालाच भोगावी लागतात. हे एकदा नीट समजून घेतले, की दोषारोप थांबतो, तक्रार कमी होते आणि स्वीकाराची प्रक्रिया सुरू होते. दुःख टाळणे अशक्य असले, तरी ते समजून, स्वीकारून, विवेकाने भोगणे नक्कीच शक्य आहे. हेच समर्थांचे मनाला दिलेले खरे प्रबोधन आहे. दुःख येणे ही जरी दैवगती असली, तरी ते आपल्याला मोडण्यासाठी नसून आपल्याला घडविण्यासाठीच येते, असे समजायला हवे. दुःखही साधनेचे माध्यम ठरते आणि जीवनाचा प्रवास अधिक अर्थपूर्ण होऊ लागतो. आपल्या आजूबाजूला असंख्य लोक असतात. त्यापैकी प्रत्येकालाच सुख-दुःखाच्या प्रसंगातून जावे लागते. म्हणून सदैव सुखी अशी व्यक्ती सापडणे जवळजवळ अशक्यच आहे हे वास्तव स्वीकारणे हाच विवेक आहे. शेवटी, दुःख टाळणे अशक्य असले तरी त्याचा सकारात्मक, विवेकपूर्ण स्वीकार करता येतो’ यासाठी समर्थांनी प्रतिपादन केलेला ‘भक्तीपंथ’ आचरणात आणणे आवश्यक आहे.

**दुःख टळता टळेना**
**कर्म भोग आकळेना**
**मन ठेवा सर्व साक्षी**
**वाट हीच विवेकाची**

**जय जय रघुवीर समर्थ !**

**भाऊसाहेब देशमुख, ९४२०३८९५४१**

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**